वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-बुधवार दि. ८ जानेवारी २०२५ पाने ४ किंमत ३

# पोलीस शिपायाची आत्महत्या; पोलीस दलात खळबळ



## आज सकाळी घटना उघडकीस; कारण अस्पष्ट

बीड, (दिव्य न्युज):- बीड पोलीस दलात शिपाई असलेले अनंत इंगळे यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना आज सकाळी ६ वाजता उघडकीस आली. या घटनेने बीड पोलीस दलात खळबळ उडाली असून, आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. अनंत मारुती इंगळे रा. कळंबअंबा (ता.केज) असे आत्महत्या केलेल्या पोलीस शिपाईचे नाव आहे. ते बीड पोलीस मुख्यालयात कार्यरत होते. ते नगर रोडवरील पोलीस वसहात येथे वास्तव्यास होते. घरा पासून काही अंतरावर पोलीस मुख्यालयाच्या संरक्षण भिंतीला लागून एका झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला. पोलीस शिपाईने आत्महत्या केल्याची बातमी समजताच बीड पोलीस दलात एकच खळबळ उडाली आहे. शिवाजीनगर पोलीस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा करुन मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल केला होता. या पोलीस शिपायाच्या आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

### अनेक सेवानिवृत्त शिक्षकांचा तळतळाट कुडकेला लागला

# १० हजाराची लाच घेतांना रंगेहाथ पकडले

अनेक सेवानिवृत्त शिक्षकांना त्रास देणारा हा महाठग एसीबीच्या जाळ्यात अडकल्याने माध्यमिक व प्राथमिकच्या शिक्षणाधिकाऱ्यांनाही घाम फुटला

Email:- dailydivyawarta@Gmail.com

दिव्य वार्ता

Email:-editordivyawarta@gmail.com

## बीडची मिल्लिया शाळा कुडकेसाठी बनली होती सोन्याचं अंड देणारी कोंबडी

### कुडकेसह सर्व सेवानिवृत्त शिक्षकांची तर दोन्ही शिक्षणाधिकाऱ्यांची एसीबीने चौकशी करावी

बीड, (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यातील लाचखोरी कमी होण्याचे नाव घेत नाही. दिवसेंदिवस लाचखोर एसीबीच्या जाळ्यात अडकले जात आहे. बीडच्या शिक्षण विभागातील (माध्यमिक) वरिष्ठ लिपिक संतोष कुडके यास ५० हजाराची लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

सेवानिवृत्त मुख्याध्यापकाचे सेवानिवृत्तीचे लाभ मिळण्यासाठी फाईल पुढे पाठवण्यासाठी ९० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. यातील पहिला टप्पा म्हणून ४० हजार रुपये घेतले होते. त्यानंतर दुसरा टप्पा ५० हजार रुपये घेताना ही कारवाई करण्यात आली. ही कारवाई बीड एसीबीचे पोलीस उपअधीक्षक शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या टीमने केली. या कारवाईने शिक्षण विभागात खळबळ उडाली आहे.



## पंकजा-धनंजयने जमीन हडपली, वाल्मिकच्या माणसांनी धमकी दिली

### प्रवीण महाजनांच्या पत्नी सारंगी महाजनांचा आरोप

बीड, (दिव्य न्युज):- एकीकडे संतोष देशमुख हत्या प्रकरणात सहकारी अडकल्याने अडचणीत सापडलेले मंत्री धनंजय मुंडे हे पुन्हा एकदा गोत्यात येण्याची शक्यता आहे. धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांनी आपली जमीन धमकी देऊन हडपल्याचा आरोप प्रवीण महाजन यांच्या पत्नी सारंगी महाजन यांनी केला. वाल्मिक कराड आणि त्यांच्या साथीदारांनी ही जमीन हडपल्याचा आरोप त्यांनी केला. महत्त्वाचं म्हणजे मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या होण्यापूर्वी जवळपास महिनाआधीच त्यांनी आरोप केला होता. सारंगी महाजन याच संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट घेणार आहेत.

▶▶ पान २ वर

## अल्पवयीन मुलीचे अपहरण, तरुणावर गुन्हा

केज, (दिव्य न्युज):- ऊसतोड मजुराच्या इयत्ता ६ वीच्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या अल्पवयीन मुलीचे दुचाकीवर बसवून पळवून नेत अपहरण केल्याची घटना केज तालुक्यातील एका गावात घडली. केज तालुक्यातील एका गावातील महिलेस पहिल्या पतीपासून दोन मुली असून दुसऱ्या पतीपासून एक मुलगा आहे. ही महिला दुसऱ्या पतीसोबत वास्तव्यास असून हे दाम्पत्य ऊसतोडणीसाठी तालुक्यात एका साखर कारखान्यावर स्थलांतरीत झाले आहे.

पान २ वर

### आ.संदीपभैय्या, सलिमभाईंच्या पाठपुराव्याला मोठे यश

# बीड शहराबाहेरून जाणाऱ्या दोन्हीही बायपास चौकात होणार उड्डाणपूल आणि सर्व्हिस रोड



बीड, (दिव्य न्युज):- आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांच्या निरंतर प्रयत्न आणि पाठपुराव्याला मोठे यश आले आहे. मा.उच्च न्यायालयाच्यख निर्देशानुसार बीड शहराच्या बाजूने जाणार्या बायपासवर दोन्ही ठिकाणी उड्डाणपूल आणि इतर ठिकाणच्या स्लीप सर्व्हिस रोडच्या कामासाठी आता निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. २२ जानेवारीपर्यंत निवीदा मागविल्या असून लवकरच काम सुरू केले जाणार आहे.

बीड बायपासवर बीड शहरात ये-जा करण्यासाठी छत्रपती संभाजी महाराज चौक समनापूर व महालक्ष्मी चौक, जिरेवाडी ही दोन ठिकाणे प्रवेशद्वार होती. परंतु याठिकाणी उड्डाणपूल नसल्यामुळे याठिकाणांवर अपघातांची मालिका सुरू होती. यासोबतच इमामपूर, नाथापूर व परळी रोडला स्लीप सर्व्हिस रोड नसल्यामुळेही या भागातील नागरिक आणि या परिसरात शेती असलेले शेतकरी यांना त्यांच्या

▶▶ पान २ वर

## वाल्मिक कराडकडे कोट्यवधींची संपत्ती, आकडा पाहून अधिकारीही थक्क



बीड, (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणामध्ये संबंधित खंडणी मागितल्याने वाल्मिक कराडला सीआयडीने अटक केली आहे. वाल्मिक कराड हा ३१ डिसेंबर २०२४ रोजी पोलिसांना शरण आला आहे. त्यानंतर केज न्यायालयाने कराडला १५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. अशातच आता वाल्मिक कराडसंदर्भात एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. वाल्मिक कराडला यापूर्वीच ईडीकडून नोटीस देण्यात आली होती. त्यामुळे वाल्मिक कराडच्या संपत्तीचा आकडा पाहून ईडीचे अधिकारी देखील थक्क झाले आहेत.बीडमध्ये वाल्मिक कराडने बेकायदेशीर उद्योगांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात दहशत

▶▶ पान २ वर

## खा.सोनवणेंनी घेतला विकास कामांचा आढावा

### अनेक खातेप्रमुखांना मुद्देसूदपणे धरले धारेवर

बीड, (दिव्य न्युज):- जिल्ह्यात विकास कामांना गती देण्यासाठी खा.बजरंग सोनवणे सरसावले असून मंगळवार दि.७ जानेवारी रोजी त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा विकास समन्वय व संनियत्रण





समितीची बैठक घेण्यात आली. खा.बजरंग सोनवणे यांच्या अध्यक्षतेखालील

▶▶ पान २ वर

## विशाळगडसह गजापूर परिसर पोलिस बंदोबस्तातून मुक्त करा

### शेकाप, माकप, उद्धवसेनेचे शाहूवाडी तहसीलदारांना निवेदन

कोल्हापुर, (दिव्य न्युज):- शाहूवाडी तालुक्यातील विशाळगडसह गजापूर परिसरातील सामान्य नागरिकांचे जनजीवन सुरळीत व्हावे, विशाळगडावर पर्यटन सुरू करण्यात यावे आणि गजापूरसह विशाळगड येथील पोलिस बंदोबस्त वे उठवावा, या मागणीचे निवेदन शाहूवाडीचे तहसीलदार रामलिंग चव्हाण यांना शेकाप, मार्क्सवादी व उध्दवसेनेच्या वतीने देण्यात आले.

विशाळगड, गजापूर परिसरात जुलै २०२४ मध्ये घडलेल्या हिंसाचारामुळे, महसूल व पोलिस

▶▶ पान २ वर

# पस्तीस आमदारांच्या निवडीला उच्च न्यायालयात आव्हान

### खंडपीठात याचिका, उमेदवारांनी घेतली न्यायालयात धाव

औरंगाबाद, (दिव्य न्युज):- नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये पराभूत झालेल्या उमेदवारांनी विजयी उमेदवारांच्या निवडीस आव्हान देणाऱ्या याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाखल केल्या आहेत. निवडणूक याचिका दाखल करण्याचा मंगळवारी शेवटचा दिवस होता.

विधानसभा निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाल्यापासून आम्ही घेतलेल्या आक्षेपांची निवडणूक आयोगाने दखल घेतली नाही, असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे. मतदार यादीतून वगळण्यात आलेली आणि नव्याने समाविष्ट केलेली नावे, प्रचारादरम्यान तसेच मतदान प्रक्रिया सुरू असताना झालेला आचारसंहितेचा भंग आणि मतमोजणी प्रक्रियेबाबत याचिकाकर्त्यांनी आक्षेप नोंदविले आहेत. निवडून आलेल्या उमेदवारांनी भ्रष्ट मार्गाचा अवलंब केल्याने त्यांची निवड रद्द करण्यात यावी, अशी त्यांची मागणी आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातून

▶▶ पान २ वर

### कोणाविरुद्ध कोणी दाखल केली याचिका?

-औरंगाबाद पश्चिम मतदारसंघातून विजयी झालेले संजय शिरसाट यांच्या विरोधात राजू शिंदे, परळीतून विजयी झालेले धनंजय मुंडे यांच्याविरुद्ध करुणा मुंडे, आष्टीचे आमदारसुरेश धस यांच्याविरुद्ध महेबूब शेख, घनसावंगीचे आमदार हिकमत उढाण यांच्याविरुद्ध राजेश टोपे, बदनापूरचे आमदार नारायण कुचे यांच्याविरुद्ध बबलू चौधरी, भोकरदनचे आमदार संतोष दानवे यांच्याविरुद्ध चंद्रकांत दानवे, परांडा येथील आमदार तानाजी सावंत यांच्याविरुद्ध राहुल मोटे, जालन्याचे आमदार अर्जुन खोतकर यांच्याविरुद्ध कैलास गोरंट्याल, लातूरचे आमदार रमेश कराड यांच्याविरुद्ध सर्जेराव मोरे, केजच्या आमदार नमिता मुंदडा यांच्याविरुद्ध पृथ्वीराज साठे, उदगीरचे आमदार संजय बनसोडे यांच्याविरुद्ध सुधाकर भालेराव, वसमतचे आमदार राजू नवघरे यांच्याविरुद्ध जयप्रकाश दांडेगावकर, अहमदपूरचे आमदार बाबासाहेब पाटील यांच्याविरुद्ध विनायकराव पाटील, धुळे जिल्ह्यातील साक्रीच्या आमदार मंजुळा गावीत यांच्याविरुद्ध प्रवीण चौरे, पारोळाचे आमदार अमोल पाटील यांच्याविरुद्ध सतीश पाटील

## हत्याकांडाला उद्या महिना पूर्ण, तीन तपास यंत्रणा बदलूनही आंधळे फरार

# न्यायालयीन चौकशीची घोषणा झाली, शासनाचे आदेश मात्र निघालेच नाहीत

बीड, (दिव्य न्युज):- सरपंच देशमुख यांच्या हत्येला गुरुवारी ९ रोजी एकमहिना पूर्ण होत आहे. गुन्ह्याच्या तपासासाठीमहिनाभरात तीन तपास यंत्रणा बदलल्या. न्यायालयीनचौकशीची घोषणा झाली असली तरी अद्याप याबाबतचेआदेश निघाले नाहीत. सुरुवातीला बीड पोलिसांनी याप्रकरणात तपास करत ४ आरोपींना अटक केली. त्यानंतरगुन्हा तपासासाठी सीआयडीकडे गेला. मात्रसीआयडीला एकाही आरोपीस अटक करता आलीनाही. नंतर तपास एसआयटीकडे गेला, मात्रएसआयटीलाही यश आले नाही. बीड पोलिसांच्यास्थानिक गुन्हे शाखेनेच ५ जानेवारीला दोन मुख्यआरोपींना पकडले. या प्रकरणात पोलिस अधीक्षकअविनाश बारगळ यांची बदली झाली. पोलिस निरीक्षकमहाजन यांना सक्तीच्या रजेवर पाठवले तर उपनिरीक्षकराजू पाटील यांना निलंबित केले आहे.



पुण्याच्या सीआयडी कार्यालयात शरणागतीच्या वेळी आरोपी वाल्मीक कराड ज्या स्कॉर्पिओतून आला, ती कार सीआयडीने जप्त करून केजला आणली.

या प्रकरणात ६ आरोपी अटकेत आहेत, तर विष्णूचाटे हा खुनातील आरोपी असला तरी सध्या तोखंडणीच्या गुन्ह्यातच अटकेत आहे. अद्याप त्यालाखुनाच्या प्रकरणात अटक केलेली नाही, तर कृष्णाआंधळे हा आरोपी फरार आहे. महिनाभरातमस्साजोगला सर्वच पक्षांच्या प्रमुख नेत्यांनी भेट दिली,बीड, परभणी व पुण्यात मोठे मूक मोर्चे झाले.शवविच्छेदन अहवालानुसार देशमुखांच्या शरीरावर ५६व्रण होते तर सुमारे दीड लिटर रक्त शरीरात साकळलेहोते. यातून आरोपींची क्रूरता स्पष्ट झाली. खूनप्रकरणानंतर आवादा कंपनीला मागितलेल्या २ कोटीखंडणीचाही गुन्हा नोंदवला गेला. त्यात वाल्मीककराडला अटक झाली.

चाटेचे नाव फक्त खंडणीत

खंडणी प्रकरणाचा गुन्हा ११डिसेंबरला नोंद झाला. त्यानंतर १८डिसेंबरला अटकेतील विष्णू चाटेयाला पहिल्यांदा खुनाऐवजी खंडणीतसीबीआयने ताब्यात घेतले आहे.अद्यापही तो याच गुन्ह्यात पोलिसकोठडीत आहे. तीन वेळा त्याचीकोठडी वाढली आहे, तर फरारकराड ३१ डिसेंबरला पुणे सीआयडीकार्यालयात शरण आला. त्याला १४जानेवारीपर्यंत पोलिस कोठडीसुनावली आहे. खून प्रकरणाच्यातपासात सीआयडीला काहीमहत्वाचे पुरावे सापडले आहेत. यातप्रामुख्याने जप्त मोबाइलमध्ये संतोषदेशमुख यांना मारहाण करतानाचेव्हिडिओ आढळले आहेत.

### कराडने पुण्यात शरणागतीसाठी वापरलेली स्कॉर्पिओ जप्त

पुण्याच्या सीआयडी कार्यालयात शरणागतीच्या वेळी आरोपी वाल्मीक कराडज्या स्कॉर्पिओतून आला, ती कार सीआयडीने जप्त करून केजला आणली.

### जप्त स्कॉर्पिओ धनंजय मुंडे समर्थकाच्या पत्नीची

पुण्याच्या सीआयडीकार्यालय कराड शरण आलात्यावेळी ज्या स्कॉर्पिओने तो आलाहोता, ती कार सीआयडीने जप्तकरून ती केज पोलिस ठाण्यातआणली. ही कार धनंजय मुंडेसमर्थक शिवलिंग मोराळे यांच्यापत्नीच्या नावावर आहे. एम. एच. २३बी. जी. २२३१ या क्रमांकाची पांढऱ्यारंगाची स्कॉर्पिओ कार कराडनेवापरली होती. हीच कार कराडनेफरार होतानादेखील वापरल्याचादावा एसआयटीने केज न्यायालयातकेला आहे. त्यामुळे ही स्कॉर्पिओकार तपासाच्या दृष्टीने जप्त करण्यात आली आहे.

### खुनात सहभागींची संख्या आठ-खा.सोनवणे

खुनाच्या घटनेनंतर पहिल्या दोनदिवसांत जयराम चाटे, महेश केदारव प्रतीक घुले यांना अटक झाली. १८डिसेंबरला विष्णू चाटेही पोलिसांनागवसला. त्यानंतर खुनाच्या २६दिवसांनी मुख्य आरोपी सुदर्शन घुले,सुधीर सांगळे यांना पुण्यातून अटककेली. हे सर्व सध्या पोलिस कोठडीतआहेत, तर कृष्णा आंधळेचाअद्यापही शोध लागलेला नाही.आरोपींकडून शस्त्र, मुख्य आरोपींचेदोन मोबाइल व जीप जप्त केली आहे.या प्रकरणात सिद्धार्थ सोनवणे हा नवाआरोपी निष्पन्न झाला असून तोहीअटकेत आहे. आरोपींची संख्या आठझाली आहे.

### हिवाळी अधिवेशन गाजले

या प्रकरणात राजकीय नेत्यांचे आरोपअधिवेशनात गाजले. आमदार संदीपक्षीरसागर यांनी कराड हाच खुनाचामास्टरमाइंड असल्याचा आरोपसर्वप्रथम केला. त्यानंतर सुरेश धसयांनी 'आका' हा शब्द वापरला तोराज्यात गाजला. अधिवेशनात आ.क्षीरसागर, आ. आव्हाड, आ. पंडित,आ. मुंदडा, आ. धस, आ. प्रकाशसोळंकेंनी दोषींना शिक्षा व्हावी, असामुद्दा मांडला होता.

## धनंजय मुंडेंकडून मंत्रिपद वाचवण्यासाठी जोरदार लॉबिंग, आतापर्यंत कोणाकोणाला फोन?

**मुंबई, (दिव्य न्युज):- बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करण्यात आली. संतोष देशमुख यांच्या हत्येने एकच खळबळ उडाली. संतोष देशमुख हत्याप्रकरणी मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराड यांचे नाव सातत्याने चर्चेत आहे. या घटनेनंतर विरोधक आक्रमक झाले असून धनंजय मुंडेंचा राजीनामा मागितला जात आहे. भाजपचे आमदार सुरेश धस, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया या नेत्यांकडून सातत्याने धनंजय मुंडेंवर आरोप केले जात आहे. आता धनंजय मुंडेंकडून मंत्रिपद वाचवण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरु आहेत.**

**सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर राजीनाम्यासाठी दबाव वाढत चालला आहे. या प्रकरणातील मुख्य तीन आरोपींपैकी दोन आरोपी पोलीस कोठडीत आहेत. तर एक जण फरार आहे. तसेच दुसरीकडे खंडणीप्रकरणी अटकेत असलेला वाल्मिक कराड हा या हत्येमागचा मुख्य सूत्रधार असल्याचा आरोप होत आहे. वाल्मिक कराड हा धनंजय मुंडेंचा निकटवर्तीय असून याप्रकरणी धनंजय मुंडेंनी नैतिकता म्हणून राजीनामा द्यावा, अशी मागणी सातत्याने सुरु आहे. आता धनंजय मुंडेंकडून मंत्रिपद वाचवण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत.**

**धनंजय मुंडे हे गेल्या काही दिवसांपासून सातत्याने अजित पवारांची भेट घेत आहेत. त्यातच काल अजित पवारांची भेट घेतल्यानंतर धनंजय मुंडेंनी तडकाफडकी राजीनामा दिल्याची चर्चा रंगली होती. त्यानंत धनंजय मुंडे यांनी 'मी काही राजीनामा वैगरे दिलेला नाही, मी जर राजीनामा दिला असता तर मी कॅबिनेटच्या मीटिंगला कसा आलो असतो?' असे स्पष्टीकरण दिले होते. यानंतर आज धनंजय मुंडे यांच्याकडून मंत्रिपद वाचवण्यासाठी लॉबिंग सुरु असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. काल धनंजय मुंडेंनी प्रफुल्ल पटेल यांची भेट घेतली होती. तर आज धनंजय मुंडेंनी सुनील तटकरेंसोबत फोनवरुन चर्चा केली. यावेळी त्यांनी सध्या घडत असलेल्या विविध प्रकरणांवर भाष्य केले.**

पान १ वरून

### पंकजा-धनंजयन

साडेतीन कोटींची जमीन ही धमकी देऊन फक्त २१ लाखांना घेतली. परळीत बोलवून कोऱ्या कागदावर सह्या घेतल्या. सही केल्याशिवाय परळीतून बाहेर जाऊ देणार नाही अशी धनंजय मुंडे यांच्या माणसांनी धमकीही दिल्याचा आरोप सारंगी महाजन यांनी केला. यामध्ये सारंगी महाजन यांनी वाल्मिक कराडचेही नाव घेतलं आहे. या आरोपांमध्ये तथ्य असेल तर मंत्री धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता वर्तवली जाते.

धनंजय मुंडेंच्या नोकराच्या नावे जमीन

सारंगी महाजन म्हणाल्या की, धनंजय मुंडे यांचा नोकर गोविंद मुंडे याने धाक दाखवून जमिनीची रजिस्ट्री केली. जोपर्यंत सह्या करत नाही तोपर्यंत परळीतून जाऊ दिले जाणार नाही अशी त्याने धमकी दिली. प्रवीण महाजन जाऊन दहा वर्ष झाले तरी ही आमच्या जमिनीवर डोळा आहे. कोऱ्या कागदावर सह्या घेतल्या आणि नंतर विसार पावती मला पाठवली. धनंजय मुंडे यांच्या घरी नोकर आहे त्याच्या नावावर ही जमीन करण्यात आली.

नंतर समजलं की चोराकडेच आलेय

साडेतीन करोड रुपयांची जमीन फक्त २१ लाखात घेतली. तीन दिवसांत सातबाराही त्यांनी बदलला. ती जमीन गोविंद मुंडे, त्याची सून आणि दशरथ साठे यांच्या नावावर केली आहे. यानंतर धनंजय मुंडे यांना मी भेटले. त्यानंतर ते टाळाटाळ करायला लागले. मामी, तुझा फॉलोअप कमी पडला असं त्यांनी मला सांगितलं. मी धनंजय मुंडे यांना हॉस्पिटलमध्ये भेटायला गेले त्यावेळी तो म्हणाला की मामी काळजी करु नको. परळीत कुठलीही जमीन विकली तर ती मला कळते. नंतर कळलं की मी चोराकडेच आलेय.

वाल्मिक कराडची माणसे

वाल्मिक कराडची कधी भेट झाली नाही, पण मला धमकवणारी माणसे ही वाल्मिक कराडची होती. यामध्ये पंकजा मुंडे यांचाही हात आहे. या संदर्भात अजित पवार आणि शरद पवारांची भेट घेऊन हा विषय त्यांच्या कानावर घातला आहे. आता मुख्यमंत्र्यांचीही भेट घेणार आहे.

### अल्पवयीन मुलीचे अपहरण,

त्यांनी दोन मुली व मुलगा शाळेसाठी आपल्या आईकडे ठेवले होते. इयत्ता ६ वीच्या वर्गात शिक्षण घेत असलेली त्यांची एक मुलगी ही ६ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता बाथरूमहून येते असे सांगून घरातून बाहेर पडली. तिला राजेश उत्तरेश्वर बारगजे (रा. टाकळी ता. केज) याने दुचाकीवर बसवून पळवून नेत अपहरण केले. अशी तक्रार तिच्या आईने दिल्यावरून राजेश बारगजे याच्याविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्या मार्गदर्शनात जमादार राजू वंजारे हे तपास करीत आहेत.

दरम्यान, या मुलीची उंची ४ फुट असून रंग गोरा व केस काळे लांब आहे. अंगात मोरपंखी रंगाचा पंजाबी ड्रेस व पायात चप्पल आहे. अशा वर्णनाची मुलगी आढळून आल्यास केज पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा. असे आवाहन जमादार राजू वंजारे यांनी केले आहे. मस्सा खंडेश्वरी (ता. कळंब जि. धाराशिव) येथे दुचाकी सोडून राजेश बारगजे हा मुलीला घेऊन तेथून पसार झाला. ही दुचाकी ताब्यात घेतल्याची माहिती जमादार राजू वंजारे यांनी दिली.

### बीड शहराबाहेरून जाणाऱ्या

शेतात जदिवसेंदिवस होत असलेले अपघात आणि जाणारे जीव यांची दखल आता मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने घेतली असून यासंदर्भातील आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्यायालयाने निर्णय दिला असून, डिसेंबर २०२४ पर्यंत १२ कि.मी. अंतर असलेल्या बीड शहराच्या लगत असलेल्या बायपासवर छत्रपती संभाजी महाराज चौक व महालक्ष्मी चौक येथे उड्डाणपूल तसेच इमामपूर रोड, नाथापूर रोड, परळी रोड या ठिकाणांवर स्लीप सर्विस रोड मंजूर करण्याचे निर्देश मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला दिले होते. त्यानुसार राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून या कामांची निविदा २ जानेवारी २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून २२ जानेवारीपर्यंत २०२५ निविदा मागविल्या आहेत. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून औरंगाबाद-येडशी महामार्गाचे चौपदरीकरण करण्याचे काम २०१५ साली सुरू करण्यात आले होते. याच कामांतर्गत महामार्गावर बीड शहराच्या पूर्व बाजूने १२ कि.मी. अंतराचा बायपास म्हणजेच बाह्यवळण रस्ता तयार करण्यात आला. परंतु हा बायपास तयार करताना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने इंडियन रोड काँग्रेसच्या गाईड लाइन्स प्रमाणे काम केले नाही. इंडियन रोड काँग्रेसच्या (खठउ) च्या गाईड लाइन्स नुसार बायपासला क्रॉस होणार्या राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, जिल्हा मार्ग याठिकाणी स्लीप सर्विस रोड करणे आवश्यक आहे. परंतु बीड बायपासवर बीड-परळी रोड हा राष्ट्रीय महामार्ग, बीड-माजलगाव हा राज्य महामार्ग व बीड-इमामपूर हा प्रमुख जिल्हा मार्ग असे तीन महत्वाचे रस्ते क्रॉस होतात. तसेच बीड शहरात महामार्गावरून प्रवेश करताना असलेले छत्रपती संभाजी महाराज चौक व महालक्ष्मी चौक या दोन्ही ठिकाणी उड्डाणपूल करण्यात आलेला नाही. ही बाब अत्यंत गंभीर आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने याठिकाणी आवश्यक असलेल्या बाबींचे पालन न केल्यामुळे आत्तापर्यंत दोन्ही चौकांमध्ये एकूण १३ लोकांचा बळी गेल्याची नोंद आहे. अनेक लोकांना कायमचे अपंगत्व आले आहे. तर दरदिवस अपघात होऊन असंख्य लोक जखमी होत आहेत. सदरील बाबी नागरिकांच्या, प्रवाशांच्या आणि वाहतुक सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी केंद्रीय सडक परिवहन मंत्री नितीन गडकरी यांना ४ डिसेंबर २०१९ रोजी, बीड बायपासवर शहराचे प्रवेशद्वार असलेल्या दोन्ही ठिकाणी म्हणजेच महालक्ष्मी चौक व छत्रपती संभाजी महाराज चौक येथे उड्डाणपूल तसेच बीड-परळी रोड, बीड-माजलगाव रोड व बीड-इमामपूर या तीन ठिकाणी स्लीप सर्विस रोड मंजूर करण्याबाबत पत्रव्यवहार केला. यावर मा.नितीन गडकरी यांनी १४ जुलै २०२० रोजी पत्राद्वारे सदरील कामे करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला सुचविले होते. त्यानंतर आ.संदीप क्षीरसागर यांनी सदरील कामांच्या मंजुरीची शिफारस राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावी अशी वारंवार मागणी केली. तसेच माजी आ.सय्यद सलीम यांनीही बायपासवर दोन्ही ठिकाणी उड्डाणपूल आणि तीन ठिकाणी स्लीप सर्विस रोड मंजूरीसाठी पत्रव्यवहार करत पाठपुरावा केला. परंतु राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून याबाबत दखल घेतली जात नसल्याने शेवटी माजी आ.सय्यद सलीम यांनी मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात याचिका क्रमांक ११७६/२०२४ व पिटीशन क्रमांक ८८०८/२०२४ दाखल केली. या प्रकरणात औरंगाबाद खंडपीठात दि.२५ सप्टेंबर २०२४ रोजी न्यायमूर्ती रविंद्र व्ही. घुगे व न्यायमूर्ती वाय.जी.खोब्रागडे यांच्या न्यायालयात सुनावणी झाली. यावेळी याचिकाकर्त्यांचे म्हणने राष्ट्रीय महामार्गाचे मुख्य कार्यालय, द्वारका, नवी दिल्ली येथे पाठविले असून या कामासाठी तांत्रिक समिती देखील स्थापन केली आहे. तसेच मार्च २०२५ पर्यंत बीड बायपासवर छत्रपती संभाजी महाराज चौक व महालक्ष्मी चौक याठिकाणी उड्डाणपूल व इमामपूर रोडच्या स्लीप सर्विस रोडला मंजुरी देऊ असे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून न्यायालयात सांगण्यात आले. परंतु न्यायालयाने या ठिकाणी होत असलेले अपघात आणि सुरक्षेच्या प्रश्नाची गंभीर दखल घेत डिसेंबर २०२४ पर्यंत तीनही कामांना मंजुरी द्या असे निर्देश दिले. न्यायालयाच्या या निर्णयामुळे बीड बायपासवरील अपघात आणि सुरक्षेचा प्रलंबित असलेला मोठा प्रश्न मार्गी लागणार असून आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. दरम्यान या प्रकरणात याचिकाकर्ते माजी आ.सय्यद सलीम यांच्या वतीने ड.सय्यद तौसिफ यासीन यांनी काम पाहिले.

### वाल्मिक कराडकडे

पसरवली आहे. तसेच त्याने बेकायदेशीर उद्योगांच्या माध्यमातून प्रचंड पैसा गोळा केल्याचं अनेक आंदोलनांच्या भाषणांमधून देखील सांगितलं आहे. मात्र याचदरम्यान आमदार सुरेश धस यांनी अगदी सविस्तरपणे सरपंच संतोष देशमुख हत्याकांड नेमकं कसं घडलं आणि वाल्मिक कराडकडून खंडणी कशी मागितली जाते याबद्दलची माहिती जाहीर कार्यक्रमांमध्ये देखील दिली आहे.

आमदार सुरेश धस धनंजय मुंडेंवर देखील निशाणा साधला आहे. धनंजय मुंडे यांनी हावरटपणाचे राजकारण केलं आहे. तसेच धनंजय मुंडेंनी वाळुतून, राखेतून पैसा कमावला आहे. याशिवाय घरकुलांसाठी त्यांनी १०-१० हजार रुपयांची वसुली केल्याचा गंभीर आरोप देखील सुरेश धस यांनी केला आहे.दरम्यान, सुरेश धस यांनी वाल्मिक कराडने तब्बल १५०० कोटींची संपत्ती जमवल्याचा खळबळजनक आरोप केला आहे. तसेच याच संपत्तीसंदर्भातील चौकशीसाठी ईडीची दोन महिन्यांपूर्वीच वाल्मिक कराडला नोटीस आल्याचं देखील धस यांनी म्हटलं आहे. म्हणजेच वाल्मिक कराडचे संपत्ती आकड्यात सांगायचं झालं तर १५००,०००,००,००,००० इतकी आहे.

मात्र आमदार धस यांनी वाल्मिक कराडच्या संपत्तीबद्दल केलेल्या दाव्यासंदर्भात खासदार बजरंग सोनावणे यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. यावेळी बजरंग सोनावणे म्हणाले की, सुरेश धस हे पाचव्या टर्मचे आमदार आहेत, त्यामुळे ते अभ्यास करून बोलणारे नेते आहेत. तसेच त्यांच्याकडे काहीतरी पुरावा असेल तेव्हाच ते बोलले असतील. त्यामुळे आता शासनाने आणि पोलीस यंत्रणेने त्या गोष्टी तपासला पाहिजे असं बजरंग सोनावणे म्हणाले आहेत.

### पस्तीस आमदारांच्या

आठ याचिका

अहिल्यानगर जिल्ह्यातून आठ जणांनी निवडणूक याचिका दाखल केल्या आहेत. यात संगमनेरचे आमदार अमोल खटाव यांच्याविरुद्ध बाळासाहेब थोरात, कर्जतचे आमदार रोहित पवार यांच्याविरुद्ध राम शिंदे, अहमदनगरचे आमदार संग्राम जगताप यांच्याविरुद्ध अभिषेक कळमकर, शेगावच्या आमदार मोनिका राजळे यांच्याविरुद्ध ड. प्रताप ढाकणे, राहुरीचे आमदार शिवाजी कर्डिले यांच्याविरुद्ध प्राजक्त तनपुरे, अकोलेचे आमदार डॉ. किरण लहामटे यांच्याविरुद्ध अमित भांगरे, पारनेरचे आमदार काशीनाथ दाते यांच्याविरुद्ध राणी लंके यांनी आणि कोपरगावचे आमदार आशुतोष काळे यांच्याविरुद्ध संदीप वरपे यांचा समावेश आहे.

### खा.सोनवणेंनी घेतला

बैठकीला जिल्हाधिकारी अविनाश पाठक, मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने आणि सर्व विभागांच्या खातेप्रमुखांची उपस्थिती होती. यावेळी खा.सोनवणे यांनी आपण सर्व मिळून जिल्ह्याच्या विकासासाठी प्रयत्न करू, असे म्हणत अधिकार्यांना विश्वासात घेतलेच शिवाय, अनेक मुद्द्यावर त्यांनी अधिकार्यांची कानउघडणी देखील केली.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात दिशा समिती अंतर्गत विषयाचा/ योजनांचा सन २०२४-२५ या वर्षाचा डिसेंबर अखेरचा आढावा खा.बजरंग सोनवणे यांनी घेतली. ११ वाजता या बैठकीला सुरूवात झाली होती. सदरील बैठक ४ वाजेपर्यंत सुरू होती. यावेळी प्रधानमंत्री आवास योजना-शहरी, स्वच्छ भारत मिशन, स्मार्ट सिटी अभियान, अटल मिशन फॉर रिजवेशन अँड अर्बन ट्रांसफॉर्मेशन, रेल्वे, महामार्ग, डिजीटल भारत भुमी-अभिलेख आधुनिकरण कार्यक्रम, एमएसईबी, टेलीकॉम, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना, प्रधानमंत्री पीक विमा योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-एकात्मीक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम, मध्यान्न भोजन योजना, सर्व शिक्षा अभियान, एकात्मिक बालविकास सेवा योजना, राष्ट्रीय आरोग्य मिशन, स्वच्छ भारत मिशन ग्रामीण, डीजीटल इंडिया पब्लीक इंटरनेट एक्सेस प्रोग्राम ग्रामपंचायतमध्ये सामान्य सेवा केंद्र उभारणे, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोत्ती अभियान, दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना आदिंचा आढावा घेण्यात आला. यावेळी रोजगार हमी योजनेतील कामे आणि जलजीवन मिशनची कामे पुर्ण का होत नाहीत, या कारणावरून खा.सोनवणे यांनी अधिकार्यांना धारेवर धरले. यावेळी प्रत्येक अधिकार्यांनी मंजूर असलेली पाच कामे निवडूण अचाणक भेटी देवून कामांची पाहणी करावी आणि होणारा भ्रष्टाचार थांबवावा, अशा सुचनाही यावेळी त्यांनी उपस्थित अधिकार्यांना केल्या.

प्रतिनियक्त्यावर खा.सोनवणेंचे बोट

जिल्हा परिषदेत प्रतिनियुक्तीवर काम करण्याचा सपाटा लावलेला आहे. अनेक ठिकाणी नियम डावलून पदभार दिलेले आहेत. जे अधिकारी पुढार्यांचे कार्यकर्ते असल्यासारखे वागतात त्यांनाच हे पद दिले असून येत्या आठ दिवसात वर्षानुवर्षे पदावर बसलेले हे लोक बाजुला करा, अशा सुचना खा.बजरंग सोनवणे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने यांना केल्या. यावेळी त्यांनी अनेक अधिकार्यांचे उदाहरण दिले आणि तेच अधिकारीही समोर असल्याने यातली वस्तूस्थिती समोर आली.

गैरहजर कर्मचाऱ्यांना नोटीस

जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समितीची बैठक दि.७ रोजी होणार असल्याने सर्व विभाग प्रमुखांना दोन दिवसांपुर्वीच कळविले होते. परंतु असे असतानाही जिल्हा परिषदेचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, महावितरणचे अधिकारी आणि बीएसएनएलचे अधिकारी उपस्थित राहीले नाहीत. या अधिकार्यांना तातडीने नोटीस पाठविल्या जातील, असे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी खा.बजरंग सोनवणे यांना शब्द दिला.

सीओंकडून खोटी माहिती, जिल्हाधिकारी संतापले

बीड शहरात अनेक समस्या आहेत. नगर पालिका प्रशासन कामच करत नाही, अशा तक्रारी आहेत. या तक्रारीला धरून खा.सोनवणे यांनी काही प्रश्न उपस्थित करत पालिकेने येणार्या करातून तरी कामे करावीत, अशा सुचना केल्या. यावेळी मुख्याधिकारी निता अंधारे यांनी ९० टक्के कर वसुली होत असल्याचे म्हटले. यावर उपस्थित जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी 'मॅडम खोटे बोलू नका, आयुक्तांच्या बैठकीत २५ टक्केच कर वसुली असल्याचे आपण सांगितले होते,' असे म्हणत सीओंचा खोटारडेपणा उघड केला. शिवाय याच कारणावरून जिल्हाधिकारी चांगलेच संतापले होते.

अन् सीईओंची बोलती बंद

बीड जिल्हा हा ऊसतोड मजुरांचा जिल्हा आहे. याठिकाणचे लोक रक्ताचे पाणी करून लेकरांना शाळा शिकवित आहेत. त्यांच्यासाठी जिल्हा परिषद हंगामी वसतिगृह चालविते. या वसतिगृहात दर्जेदार आहार दिला जातो का?, असा सवाल खा.बजरंग सोनवणे यांनी केला. इतकेच नाही तर सीईओ यांनी या लेकरांच्या वसतिगृहांना किती वेळा भेट दिली, असा थेट मुद्द्याला हात घातल्यानंतर सीईओ आदित्य जीवने यांची बोलती बंद झाली. शिवाय भेट दिली असेल तर फोटो दाखवा, असेही खासदारांनी म्हटल्याने सीइओंची चांगलीच तारांबळ उडाली.

### विशाळगडसह गजापूर परिसर

प्रशासनाने गजापूरपैकी केंबुर्णेवाडी व विशाळगड पायथ्याशी बंदोबस्त ठेवला आहे. पोलिस बंदोबस्तामुळे सहा महिने येथील जनजीवन विस्कळीत होऊन उपासमारीची वेळ आली आहे. प्रशासनाने तातडीने पोलिस बंदोबस्त उठवावा तसेच गडावर होणाऱ्या उत्सवांना सर्वांना निमंत्रित करावे, राज्य परिवहन विभागाने बससेवा सुरू करावी, आदींसह सोळा मागण्यांचा समावेश असलेले निवेदन दिले. पोलिस बंदोबस्त उठवून नागरिकांना न्याय द्यावा, अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे राज्य चिटणीस कॉ. उदय नारकर यांनी केले आहे.

शासनाने आम्हाला महिन्याला रेशन पुरवावे, अशी मागणी मंगेश पाटील यांनी केली. मागण्यांचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास पाठविणार असल्याचे तहसीलदार रामलिंग चव्हाण यांनी सांगितले. निवेदनावर शेकापचे भारत पाटील, उदय नारकर, माजी नगरसेवक विनायक कुंभार, तसेच राजेंद्र देशमाने, राजाराम मुगदूम, मुराद मुजावर, गणी ताम्हणकर, महमद प्रभूलकर, संदीप भोसले, मलिक मुजावर आदींच्या सह्या आहेत.